अंतकाली नफा क्र. ०१/२०१९ निशाणी ७१

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – अंगद दत्तराव कदम

वय – ३० वर्षे व्यवसाय – प्रशासकीय अधिकारी, नगरपरिषद, बाळापुर

पत्ता – श्रीराम नगर, शेगांव ता. शेगांव, जि. बुलढाणा

**अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.भुतडा यांच्या मार्फत सरतपास**

१. मला न्यायालयाचा साक्ष समन्स मिळाला आहे. मी साक्ष समन्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे बाळापुर बस स्टॅन्डच्या आजुबाजुच्या परिसरातील भाडे पत्रकाचे मुळ कागदपत्र सोबत आणले असुन त्याची सत्यापित प्रत न्यायालयात दाखल केलेली आहे. सदर दस्तामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ७२** देण्यात येते. सदर दस्ताप्रमाणे गजानन झाडे यांचे भाडे रु. ११,९६४/– आणि त्यावरील कर रु. ५९३६/– असे एकुण भाडे रु. १७,९३६/– इतके आहे. त्याचप्रमाणे वैभव गुजराथी यांचे भाडे रु. ११,९६४/– आणि त्यावरील कर रु. ५९३६/– असे एकुण भाडे रु. १७,९००/– इतके आहे. गजानन झाडे आणि वैभव गुजराथी नगरपरिषदेचे जुने भाडेकरु आहेत. दरवर्षी सदर भाडेकरुंच्या भाडयात ५ टक्के इतकी वाढ करण्यात येते. आजरोजी बस स्टॅन्ड परिसरात कोणतीही जागा भाडयाने दिल्यास दरमहा त्याचे भाडे रु. ३ ते ४ हजार प्रतिमाह इतके आहे.

सरतपास पूर्ण.

**गैरअर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांच्या मार्फत उलटतपास**

२. नि.क्र. ७२ वरील दस्तावर अ.क्र. ९२ नजिबुल हक यांच्या नावा खाली भाडे आणि कर स्वतंत्र लिहिलेले नाही. मी सोबत आणलेल्या अभिलेखात अ.क्र. ९३ वरील गजानन मुरलीधर झाडे यांच्या नावा खाली भाडे आणि कर स्वतंत्र लिहिलेले नाही. मी सोबत आणलेल्या अभिलेखात अ.क्र. ९४ वरील वैभव बाळकृष्ण गुजराथी यांच्या नावा खाली भाडे आणि कर स्वतंत्र लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ दस्तावर भाडे आणि टॅक्स असे स्वतंत्र लिहिलेले नसतांना मी न्यायालयात दाखल केलेल्या दस्तावर भाडे आणि टॅक्स वेगवेगळे नमुद केले आहे. अ.क्र. ९२ वरील नजिबुल हक यांचे क्षेत्रफळ १२,९०० चौ.फुट इतके आहे. तसेच अ.क्र. ९३ आणि अ.क्र. ९४ वरील गजानन झाडे आणि वैभव गुजराथी यांचे प्रत्येकी क्षेत्र १०,३४४ चौ. फुट आहे. हे

म्हणणे खरे आहे की, नजिबुल हक, गजानन झाडे आणि वैभव गुजराथी यांची पक्की दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नगरपरिषद मार्फत या दुकानदारांना सर्व सोई सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

३. प्रत्येक ३ किंवा ५ वर्षांनंतर दुकान, घर मिळकतीची कर आकारणी केली जाते. त्यावेळी कर आकारणी करुन भाडेवाढ केली जाते किंवा कसे त्याबद्दल मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, गजानन झाडे आणि वैभव गुजराथी यांच्या भाडयात दरवर्षी ५ टक्क्यांची भाडेवाढ केली जाते याबद्दल नि.क्र. ७२ वर कुठेही नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दरवर्षी भाडेकरुंच्या भाडयात ५ टक्क्याने भाडेवाढ केली जाते ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कोणताही दस्त नाही असे असतांना मी अंदाजे ५ टक्क्याने भाडेवाढ केली जाते असे न्यायालयात सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी बस स्टॅन्ड परिसरात प्रतिमाह रु. ३ ते ४ हजार भाडयाने जागा दिले जाते ही बाब दर्शविणारा माझ्याकडे कोणताही दस्त नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे त्याबाबत कोणताही दस्त नसतांना मी अंदाजे रु. ३ ते ४ हजार भाडे असल्याबाबत सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, गजानन झाडे आणि वैभव गुजराथी यांचे प्रत्येकी भाडे रु. ११,९६४/– आणि प्रत्येकी टॅक्स रु. ५९३६/– असे एकुण भाडे रु. १७,९००/– असे नि.क्र. ७२ वर चुकीचे नमुद केले आहे.

प्रश्न – नगरपरिषदेच्या हद्दीत कोणतेही दुकान, मालमत्ता, घर आणि जागा या मिळकतींची भाडेवाढ करावयाची असल्यास संबंधीत मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार त्यांची आकारणी करुन भाडेवाढ केली जाते आणि त्याकरीता नगरपरिषदेची स्वतंत्र यंत्रणा आहे?

उत्तर – त्याबद्दल मला माहित नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.09.17 17:52:08 +0530

दिनांक : १७/०९/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.